PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Chandne shimpit jaa
Year: 1982

Song: Gheuni jashi tuj dilele
Lyricist:

घेऊन जाशी तुच दिलेले
सौभाग्याचे दान
माधवा कुठे गुंतले ध्यान
माधवा कुठे गुंतले ध्यान
घेऊन जाशी तुच दिलेले
सौभाग्याचे दान
माधवा कुठे गुंतले ध्यान
माधवा कुठे गुंतले ध्यान

त्रैलोक्याचा तुच विसावा
तुझ्या घरी का न्याय नसावा
त्रैलोक्याचा तुच विसावा
तुझ्या घरी का न्याय नसावा
सकल जनांचा कैवारी तू
मी तर एक अजाण
माधवा कुठे गुंतले ध्यान
माधवा कुठे गुंतले ध्यान
माधवा कुठे गुंतले ध्यान
माधवा...

तुच बांधिल्या मंगल गाठी
घर गंगेच्या पावन काठी
तुच बांधिल्या मंगल गाठी
घर गंगेच्या पावन काठी
विसरलास का तुच दिलेले
मंगलमय वरदान
माधवा कुठे गुंतले ध्यान
माधवा कुठे गुंतले ध्यान
माधवा कुठे गुंतले ध्यान
माधवा माधवा

ही कसली रे तुझी परीक्षा
अपराधाविन देते शिक्षा
ही कसली रे तुझी परीक्षा
अपराधाविन देते शिक्षा
मनोमनी मी जपले देवा
एक सतीचे वाण
माधवा कुठे गुंतले ध्यान
माधवा कुठे गुंतले ध्यान
घेऊन जाशी तुच दिलेले
सौभाग्याचे दान
माधवा कुठे गुंतले ध्यान
माधवा कुठे गुंतले ध्यान
माधवा माधवा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*